# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in


25 वर्षे विकासाची

"माझे शहर, माझा अभिमान"

पुण्यश्लोक 300

जा. क्र. मनपा/सा.प्र./ ५७ /२०२६-२७ दि.२७ /०४/२०२६

**आदेश**

**शुक्रवार, दि. ०१/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त** सकाळी ८.१५ वा. घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारूढ पुतळयास व सकाळी ८.४५ वा. एम.टी.एन.एल समोर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयास व सकाळी ९.०० वा. महानगरपालिका मुख्य कार्यालयासमोर प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे अर्धाकृती पुतळयास **मा. महापौर श्रीम. डिंपल मेहता** यांच्या शुभहस्ते व मा. आयुक्त श्री. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) व मा. उपमहापौर श्री. ध्रुवकिशोर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच मा. स्थायी समिती सभापती, मा. महिला व बालकल्याण समिती सभापती व उपसभापती, मा. अध्यक्षा रौप्य महोत्सवी वर्ष समिती, मा. सभापती प्रभाग समिती क्र. १ ते ६ तसेच सर्व प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी, पत्रकार वर्ग यांच्या समवेत पुष्पहार अर्पण करणेचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

तद्नंतर महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे समोरील प्रांगणात सकाळी ९.१५ वा. ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी सदर कार्यक्रमांकरीता खालील अधिकाऱ्यांचे निर्देशानुसार नेमून दिलेल्या ठिकाणी उपस्थित राहुन महाराष्ट्र दिनांच्या कार्यक्रमांचे कामकाज सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकारी/ कर्मचारी | कामाचे स्वरूप |
|---|---|---|
| १. | श्री. दिपक खांबीत<br>शहर अभियंता (स्थापत्य.) | • महाराष्ट्र दिना निमित्त मुख्य कार्यालयाच्या इमारतीस रोषणाई करण्याची व्यवस्था, प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पुतळयाची रंगरंगोटी करुन परिसरात सुशोभिकरण करणे.<br>• काशिमिरा व घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा व एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा तसेच मुख्य कार्यालय येथील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी पुतळयांजवळ रोषणाई करण्यात यावी. |
| २. | श्री. योगेश गुणिजन<br>सहा. आयुक्त, मि.भा.मनपा | • राष्ट्रध्वज बांधणी करणे, ध्वजरोहणाची रंगीत तालीम घेणे. |
| ३. | श्रीम. दिपाली पोवार<br>सहा. आयुक्त शिक्षण विभाग | • सुत्रसंचालन करण्याकरीता व राष्ट्रगीत, ध्वजगीत, राज्यगीत गायन करण्याकरीता शिक्षक व विद्यार्थी यांच्यासह वेळेवर उपस्थित राहणे. |
| ४. | श्री. प्रकाश बोराडे<br>प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी | • काशिमिरा व घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पूर्णाकृती पुतळे आपल्या विभागामार्फत स्वच्छ धुवून घेण्यात यावेत. तसेच सदरचा परिसरहो धुवून |

| | | |
|---|---|---|
| | | घेण्यात यावा.<br>• अग्निशमन विभागाची हायड्रोलीक शीडी त्यांच्या चालकासह नमुद ठिकाणी न चुकता तयार ठेवावी. याबाबत संबंधित विभागाच्या अधिनस्त अधिकाऱ्यांना आदेश देऊन कार्यवाही करावी. नियोजित कार्यक्रमामध्ये बाधा येणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |
| ५. | श्री. नागेश विरकर<br>मुख्य उदयान अधिक्षक,<br>मिरा भाईंदर महानगरपालिका | • एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा, मुख्य कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे अर्धकृती पुतळे धुवून स्वच्छ करावेत. तसेच आजू बाजूच्या परिसरात साफ सफाई करावी.<br>• एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथे सकाळी ८.३० वाजता तीन मोठे पुष्पहार, तीन श्रीफळ घेऊन नचुकता उपस्थित रहावे. याबाबत हलगर्जीपणा होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी.<br>• घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पूर्णाकृती पुतळ्या करीता सकाळी ८.00 वाजता तीन मोठे पुष्पहार, तीन श्रीफळ घेऊन न चुकता उपस्थित रहावे. याबाबत हलगर्जीपणा होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |
| ६. | श्री. योगेश गुणिजन<br>सहा.आयुक्त,<br>घनकचरा व्यवस्थापन विभाग | सर्व कार्यक्रमा ठिकाणी साफ-सफाई व स्वच्छता करणेकरीता स्वच्छता अधिकारी/कर्मचारी यांची नेमणुक करावी व सदर कामावर नियंत्रण करावे. |
| ७. | श्री. राजकुमार घरत<br>जनसंपर्क अधिकारी | फोटोग्राफी करणेकरीता फोटोग्राफर उपलब्ध करणे व सदर कार्यक्रमाचे परिपत्रक मा. संपादक, पत्रकार,इ ना वाटप करण्याचे काम आपल्या विभागाकडून करण्यात यावे. तसेच परिपत्रकास महानगरपालिकेच्या वेबसाईट तसेच नोटीस बोर्डावर प्रसिध्दी द्यावी. |
| ८. | श्रीम. दिपाली पोवार<br>सहा. आयुक्त, शिक्षण विभाग | सुत्रसंचालन, राष्ट्रगीत, ध्वजगीत राज्यगीत करण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांच्यासह वेळेवर उपस्थित राहणे. |
| ९. | श्री. सुनिल यादव,<br>सहा. आयुक्त, आस्थापना विभाग | सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा रक्षक कर्मचारी यांना उपस्थित राहणे करीता आदेशित करावे. |
| १०. | १. श्री. नरेंद्र डोंगरे<br>पदनिर्देशित अधिकारी, प्रभाग क्र. १<br>२. श्री. कुमार तंगवेल (स.का.),<br>श्री. राजेंद्र अय्यातोरे (स.का.),<br>श्री. मधुकर भोईर (स.का.),<br>श्री. परशुराम सिंगाराम (स.का). | ध्वजाचे रक्षण करावे व ध्वज सुर्यास्तास उतरविला जाईल याची दक्षता घ्यावी. |

वरील प्रमाणे नमुद अधिकाऱ्यांनी सोपविलेले कामकाज जबाबदारीने पार पाडावे. सदर कार्यक्रमादरम्यान कोणतीही उणीव राहणार नाही याची संबंधीतांनी दक्षता घ्यावी.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव :**
**मा. आयुक्त महोदय, मि.भा.मनपा**